


दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १८९ •बुधवार, दि.०८ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955






# मनोज जरांगेंचं बिल कोण देतं ?

## आमच्याकडे सगळी माहिती., भुजबळांचा पुन्हा घणाघात

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद गॅझेट लागू केल्यानंतर मराठा विरोधात ओबीसी समाज असं चित्र निर्माण झालं आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊ नये, त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्यात यावं अशी भूमिका ओबीसी समाजाची आहे. ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणावरून आता आक्रमक भूमिका घेतल्याचं पहायला मिळत आहे, त्यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते उगाच बोलतात, ते काही नेता नाहीत, यांना कोणी नेता केलं? असा सवाल यावेळी भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.

या मनसाला एकतर काही येत नाही, टीव्ही चालू झाला की बोलायला सुरुवात करतात. तिकडचे त्यांचे लोक मॅनेज आहेत, कुणबी समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. मराठा सम ाजाला आरक्षण देण्यास देखील आमचा विरोध नाही, पण त्यांना वेगळं आरक्षण द्यावं. आमच्या सगळ्या रीट याचिका अजूनही जिवंत आहेत, काहीच फेटाळलेले नाही. ते एक मराठा लाख म्हणतात, पण आम्ही ३७४ जाती आहेत. मात्र आपल्याला ओबीसी म्हणून एकत्रित लढाई लढावी लागेल. मी काय माळी संघटना आणि परिषद काढली नाही, मी समता परिषद काढली आहे, दलीत आणि आदिवासी यांच्यासाठी भांडण केले आहे, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले जरांगे पाटील उगाच बोलतात, ते काय नेता आहेत का? त्यांना कोणी केलं नेता? अरे मला बाळासाहेब ठाकरे यांनी नेता केलं आहे. शिवाजी पार्कवर मला शाखाप्रमुख केले आहे. पण मंडल आयोगामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्याशी मतमतांतर झाले, नंतर मी राष्ट्रवादीत आलो. यांना काही माहीत नाही, पहिली पण शिकला आहे की नाही, काय माहीत, असा खोचक टोला यावेळी जरांगे पाटील यांना भुजबळांनी लगावला आहे. ते सध्या हॉस्पिटलमध्ये आहेत, तुमचं एवढं बिल कोण देते? आमच्याकडे संपूर्ण माहिती आहे. मला काम आहे, शेतकऱ्यांबाबत विषय सुरू आहेत, आम्ही शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ५०० कोटी दिले, शेतकऱ्यांसाठी एवढे कोणीच दिले नाही, कोणत्याच सरकारने दिले नाहीत, असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

# महायुती सरकारने फसवे पॅकेज जाहीर करताना शेतकऱ्यांची थट्टा केली

## हंबरडा मोर्चात जाब विचारणार अंबादास दानवे

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे शेती, पिकांचे, अतोनात नुकसान झाले असून त्यांच्यावर आसमानी सुलमानी संकट ओढवले आहे. अशा संकटावेळी तीन पक्षाचे महायुती सरकार गेंड्याची कातडी पांघरून शांत बसलेले आहे. सत्ताधाऱ्यांना झोपेतून जागे करण्यासाठी व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळाली पाहिजे, शेतकऱ्यांना



संपूर्ण कर्जमुक्ती मिळाली पाहिजे या मागण्याकरिता संभाजीनगर येथे शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आले. असून या मोर्चात हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान बीड येथील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले. पुढे बोलताना अंबादासजी दानवे यांनी म्हटले की आज मुख्यमंत्र्यांनी फसवे पॅकेज जाहीर करताना शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसले ६० लाख शेतकऱ्यांसाठी निकषाच्या पलीकडे जात फक्त ६ हजार कोटी सोडले आहे. ज्यांची

▶▶ उर्वरित पान २ वर

# खा.बजरंग सोनवणे मुंबईवरुन आले असे कपिलधार वाडीत गेले; जमिनीला पडलेल्या भेगांची केली पाहणी

## स्थलांतरित ग्रामस्थांशी संवाद साधत दिला धीर तातडीने सर्वेक्षण करण्याबाबत तहसीलदारसोबत चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाली ग्राम पंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात जमिनीतील भेगा व जमीन खचणे असे प्रकार घडल्याने नागरिक भयभीत आहेत. या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (ऋडख), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिलेले आहे. दरम्यान, दि.७ रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईवरून बीड जिल्ह्यात दाखल झाले. आल्या आल्या ▶▶ उर्वरित पान २ वर



# बीडच्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी, रेल्वेपाठोपाठ विमानही लॅंड होणार, नेमकं कुठे असणार एअरपोर्ट?

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. रेल्वे सुरू झाल्यानंतर आता बीडमध्ये विम ानही लॅंड होणार आहे. यासाठी प्रशासनाने कामखेडा परिसरात प्रस्तावित विमानतळासाठी जागा निश्चित केली आहे. एअरपोर्ट प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि म हाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पो




रेशन या संस्थांच्या अधिकाऱ्यांनी कामखेडा परिसराची पाहणी केली. प्राथमिक चर्चेतून असा निष्कर्ष

▶▶ उर्वरित पान २ वर

# पैशाच्या व्यवहारातून तरुणाचे अपहरण दोघा जणांविरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

कापसाच्या व्यापाराच्या व्यवहारातून वाद निर्माण होऊन एका ३५ वर्षीय तरुणाचे अपहरण करण्यात आल्याची घटना गेवराई तालु३यात घडली असून या प्रकरणी दोघा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वचिष्ठ भीमराव ठोसर याचे कल्पेश संतराम काळे व सचीन काळे (रा. वडगाव ता. गेवराई) या दोघांनी पैशाच्या कारणावरून अपहरण केले. या प्रकरणी भीमराव देवराव ठोसर याने पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यानुसार दोघा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कापसाच्या व्यवहारातून तरुणाचे अपहरण झाल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात कलम १२४, १३७, ३५१, ३५१ (३) ३ (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास गेवराई पोलीस करीत आहे. सदरील ही घटना २९ सप्टेंबर रोजी सकाळच्या ▶ उर्वरित पान २ वर

# अपघाताने उघडकीस आली जनावरांची तस्करी



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. अहिल्यानगर-बीड राष्ट्रीय महामार्गावरील शेरी बुद्रुक येथे मंगळवारी सकाळी झालेल्या एका भीषण अपघातामुळे नवजात वासरांच्या कत्तलीसाठी होणारी क्रूर तस्करी उघड झाली आहे. अपघातात सापडलेल्या महागड्या कारमध्ये १५ निष्पाप वासरे अत्यंत अमानुषपणे कोंबून नेली जात होती. मंगळवारी सकाळी सहा वाजेच्या सुमारास (एम.एच २०,बी.क्यू. ३२३२) क्रमांकाची एक महागडी कार अहिल्यानगरहून परळीच्या दिशेने जात असलेल्या दुसऱ्या एका चारचाकी वाहनाला पाठीमागून ▶ उर्वरित पान २ वर

# २ सप्टेंबरचा जीआर रद्द होणार नाही

## हायकोर्टाने हैदराबाद गॅझेटियर संदर्भातील याचिका फेटाळल्या




**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसाठी मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे फलित म्हणजे शासनाने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, हैदराबाद गॅझेटिरयच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात आलं आहे. मात्र, या निर्णयाला ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध करत न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिल्याने मराठा समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच, राज्य सरकारने केलेल्या युक्तिवादानंतर उच्च न्यायालयाने हैदराबाद गॅझेटियरच्या शासन आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे राज्य सरकारला देखील मोठा दिलासा मिळाला आहे. हायकोर्टाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयास याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, हायकोर्टाने या याचिका फेटाळून ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनगर आरक्षणासाठी टोकाचे पाऊल गळफास घेऊन मृत्यूला कवटाळले

## बलिदान वाया जाऊ देऊ नका, चिठ्ठी लिहून केली विनंती ; नातेवाईकांनी पावणेआठ कोटींचा निधी मंजूर ; मृतदेह ठेवला गेवराई तहसील समोर ;तालुका प्रशासनाची धावपळ

**गेवराई । प्रतिनिधी**

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे या मागणीसाठी शहरातील एका ४५ वर्षीय इसमाने टोकाचे पाऊल उचलत राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज मंगळवारी (दि.७) सकाळी



उघडकीस आली. मयताच्या खिशातून बलिदान वाया जाऊ देऊ नका अशी विनंती केल्याची चिठ्ठी सापडल्याने ही आत्महत्या आरक्षणासाठी केल्याचे दिसून येत आहे. तर संतप्त नातेवाईकांनी मृतदेह गेवराई तहसील कार्यालय समोर ▶▶ उर्वरित पान २ वर

# टाकळगाव शिवारातल्या बंधाऱ्यामध्ये तरुणाचा मृतदेह;

## दुपारपर्यंत ओळख पटली नव्हती

**गेवराई । प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्यामध्ये बीड जिल्ह्यातल्या सर्वच नद्या-नाल्यांना महापूर आला होता. या महापुराने अनेक ठिकाणी नुकसान झाले. पाणी ओसरल्यानंतर टाकळगाव शिवारातील एका बंधाऱ्यात ३५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी पोलिसांनी जावून पंचनामा केला. या तरुणाची आज ▶▶ उर्वरित पान २ वर



# अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या

## दोन महिन्यात दीडशे शेतकऱ्यांनी जीवन संपविले



**बीड । प्रतिनिधी**

ऑगस्ट- सप्टेंबर महिन्यामध्ये महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. यामध्ये शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले. सर्वाधिक नुकसान मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे झाले. शेती उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी आत्महत्या वाढू लागल्या. गेल्या दोन महिन्यांच्या कार्यकाळात मराठवाड्यात दीडशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात राज्यात मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे महाराष्ट्रातल्या जवळपास ७० लाख हेक्टर शेती पिकांचे नुकसान झाले. सर्वाधिक नुकसान मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे झाले. शेती उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले. मराठवाड्यात आधीच शेतकरी आत्महत्या ▶▶ उर्वरित पान २ वर



# ८ ऑक्टोबर : भारतीय वायुसेना दिन

भारत हा एक विशाल देश आहे, ज्याच्या संरक्षणासाठी तीन प्रमुख दल कार्यरत आहेत — थलसेना (Army), नौदल (Navy) आणि वायुसेना (Air Force). या तिन्ही दलांमध्ये वायुसेनेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ती आपल्या देशाचे आकाशातून संरक्षण करते. दरवर्षी ८ ऑक्टोबर रोजी भारतीय वायुसेना दिन (Indian Air Force Day) अत्यंत उत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला जातो.

भारतीय वायुसेनेचा इतिहास : भारतीय वायुसेनेची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिशांच्या काळात "रॉयल इंडियन एअर फोर्स" या नावाने झाली. त्या वेळी तिच्या ताफ्यात केवळ काही मोजकी विमाने आणि काही वैमानिक होते. पहिली अधिकृत उड्डाण मोहीम १ एप्रिल १९३३ रोजी सुरू झाली, ज्यात ६ वैमानिक आणि ४ वेस्टलँड व्हॅपिटी विमानं होती. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर "रॉयल" हा शब्द काढून टाकण्यात आला आणि ती भारतीय वायुसेना (Indian Air Force) म्हणून ओळखली जाऊ लागली. तेव्हापासून वायुसेना निरंतर विकसित होत गेली आणि आज ती जगातील सर्वोत्तम वायुसेनांपैकी एक मानली जाते.

वायुसेनेची भूमिका आणि जबाबदाऱ्या

भारतीय वायुसेनेचे मुख्य उद्दिष्ट आहे — देशाच्या हवाई सीमांचे रक्षण करणे. पण तिची जबाबदारी फक्त युद्धापुरती मर्यादित नाही; ती शांतीच्या काळातही अनेक महत्त्वाची कामे पार पाडते.

ती खालील क्षेत्रांत कार्य करतेः

1. देशाचे हवाई संरक्षणः शत्रूराष्ट्रांच्या हल्ल्यांना तोंड देणे व प्रत्युत्तर देणे.
2. भूसेनेला सहाय्यः युद्धाच्या वेळी शत्रूच्या ठिकाणांवर हवाई हल्ले करून थलसेनेला मदत करणे.
3. राहत आणि बचावकार्यः पूर, भूकंप, हिमस्खलन, चक्रीवादळ यांसारख्या आपत्तींमध्ये मदतकार्य करणे.
4. आंतरराष्ट्रीय मोहिमाः संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भाग घेणे आणि परदेशी नागरिकांची सुटका करणे.

शौर्यपूर्ण युद्धे आणि ऑपरेशन्स

भारतीय वायुसेनेने अनेक युद्धांमध्ये अतुलनीय शौर्य दाखवले आहेः

१९४७-४८ः काश्मीर युद्धात वायुसेनेने थलसेनेला मोठे सहाय्य केले.

१९६५ः पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात वायुसैनिकांनी शत्रूची विमाने आणि ठाणे उद्ध्वस्त केली.

१९७१ः बांगलादेश मुक्तिसंग्रामात भारतीय वायुसेनेच्या पराक्रमामुळे पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली.

१९९९ः कारगिल युद्धात भारतीय वैमानिकांनी हिमालयाच्या कठीण परिस्थितीतही शत्रूच्या तळांवर अचूक हल्ले केले.

या सर्व लढायांनी वायुसेनेची ताकद आणि तांत्रिक क्षमता जगासमोर सिद्ध केली.

वायुसेना दिनाचे आयोजन : प्रत्येक वर्षी ८ ऑक्टोबरला संपूर्ण देशभरात वायुसेना दिन साजरा केला जातो. या दिवशी देशभरातील सर्व एअरबेसवर विविध कार्यक्रम, परेड आणि हवाई प्रदर्शनं आयोजित केली जातात. यातील सर्वात मोठा आणि भव्य कार्यक्रम दिल्लीजवळील हिंडन एअरबेस (गाझियाबाद) येथे होतो. येथे वायुसैनिक परेड करतात, हवाई कसरती दाखवतात, विविध विमानांचे प्रदर्शन करतात आणि भारताच्या संरक्षणशक्तीचे दर्शन घडवतात.

हवाई शोमध्ये सुखोई, तेजस, मिराज-२०००,




राफेल सारखी अत्याधुनिक विमाने सहभागी होतात. या दिवशी देशभरातील नागरिक, शालेय विद्यार्थी आणि जवान अभिमानाने "जय हिंद" चा नारा देतात.

वायुसेनेचे बोधवाक्य आणि ध्येय : भारतीय वायुसेनेचे बोधवाक्य आहे —

**"नभः स्पृशं दीप्तम्"**

**(अर्थ – "तेजाने आकाशाला स्पर्श करा")**

हे वाक्य भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायातून घेतले गेले आहे. यातून वायुसैनिकांच्या धैर्य, शौर्य आणि उच्च ध्येयांच्या प्रतीकात्मक भावना व्यक्त होतात. वायुसेनेचा ध्वज निळ्या रंगाचा असून त्यावर अशोकचक्र आणि तीन रंगांचे पट्टे आहेत, जे आपल्या राष्ट्रध्वजाचे प्रतीक आहेत.

भारतीय वायुसेना ही फक्त एक संरक्षण दल नाही, तर ती आपल्या देशाचा गौरव आणि अभिमान आहे.

ज्याप्रमाणे पक्षी मुक्तपणे आकाशात झेपावतो, त्याचप्रमाणे आपल्या वायुसैनिकांनी देशासाठी आकाश जिंकले आहे.

८ ऑक्टोबरचा दिवस हा केवळ उत्सव नसून, तो आपल्या सैनिकांच्या त्याग, पराक्रम आणि देशभक्तीचा सन्मान आहे. या दिवशी आपण सर्वांनी वायुसेनेप्रती कृतज्ञता व्यक्त करावी आणि देशभक्तीची शपथ घ्यावी.

– संकलन

**शबनम मुजीब खान**

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

◆ पान ९ वरून पुढे...

## महायुती सरकारने...

जमिनीतील माती खरडून गेली आहे त्यांना हेक्टरी ४७ हजार रुपये व मनरेगा तून ३ लाख रुपये देऊ असे जाहीर केले मनरेगाचे आधीच्याच कामाचे पैसे हे सरकार अजून पर्यंत देऊ शकले नाहीत. या कामाचे कधी पैसे देणार हा प्रश्न आहे शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार केला तर ही मदत पुरेशी नसून त्यांना तात्काळ मदत ती सोबत कर्जमुक्ती मिळाली पाहिजे. एका शेतकऱ्याला शेतात काळ टाकायचा असेल जमिनीची लेवल करायची असेल तर त्यासाठी आधी मनरेगा कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागेल मग कामानुसार मजूर ठरणार मग मजुरांना पैसे देणार हे फक्त मुख्यमंत्र्यांना वेळ काढून धोरण अवलंबिले आहे. यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव म्हणाले की मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्ज माफी मिळाली पाहिजे या मागणीसाठी स्वतः उद्धव साहेब ठाकरे मैदानात उतरले असून आपण सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने हंबरडा मोर्चा सहभागी व्हावे. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गणेश वरेकर यांनी मनोगत व्यक्त केले व जास्तीत जास्त संख्येने मोर्चात उपस्थिती लावू असा विश्वास दिला या बैठकीचे सूत्रसंचालन गोरख सिंघन यांनी केले तर आभार प्रदर्शन विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे यांनी केले. या बैठकीस शिवसेना संपर्क प्रमुख परशुराम जाधव, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे , परमेश्वर सातपुते, शिवसेना प्रवक्ते गणेश जाधव ,जिल्हा संघटक भाई संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख रामराजे साळुंखे आजिनाथ खेडकर ,राजूभाऊ महुवाले, आशिष मस्के ,हनुमान जगताप, जिल्हा संघटक नितीन धांडे महिला संघटक मीराताई नवले प्रमिलाताई माळी,तालुकाप्रमुख अजय दाभाडे सुभाष राऊत मुकुंद शिंदे विनायक मुळे सोपान काका मोरे अशोक जाधव श्रीधर गरड भोजराज पालीवाले लक्ष्मण सोळुंके अशोक गाढवे रवि वाघमारे नामदेव सोळंके संजय शिंदे हरिभाऊ खेडेकर राजेश कोकणे उपस्थित होते.

## खा.बजरंग सोनवणे...

त्यांनी केजला न जाता कपिलधारवाडीत जात भेगांची पाहणी केली. कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (ऋडख) केंद्रातील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी संबंधित विभागाला दिले आहे. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे विकास कामाच्या निमित्ताने दोन दिवस मुंबईत होते. ते मंगळवारी सायंकाळी बीड जिल्ह्यात दाखल झाले. जिल्ह्यात आल्यानंतर ते थेट कपिलधारवाडीत गेले. गावात पडलेल्या भेगा आणि पडझडीची पाहणी केली. त्याठिकाणी गावातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केलेले असून त्याठिकाणी महिला भगिनीची भेट घेतली. ग्रामस्थांशी संवाद साधत त्याना धीर दिला. आपण उपाय योजनासाठी पत्रव्यवहार करत आहोत. तुम्ही काळजी करू नका, मी तुमच्यासोबत आहे, असा विश्वासही दिला. यावेळी बीडचे तहसीलदार सोबत होते. भूगर्भ सर्वेक्षण विभागाकडे अशी मागणी – सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (छऊज) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी. या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे.

## बीडच्या नागरिकांसाठी...

काढण्यात आला की, बीड जवळील कामखेडा परिसर विमानतळ प्रकल्पासाठी सर्वात योग्य ठरेल. अधिकार्यांच्या मते, या ठिकाणी राज्य सरकारकडे दोनशे एकर पेक्षा अधिक जमीन उपलब्ध आहे. जमिनीचा उतार, भौगोलिक परिस्थिती आणि परिसराची सुसंगतता हे सर्व विमानतळ उभारणीस पोषक आहेत. या प्रकल्पासाठी एकूण १७० हेक्टर जमीन लागणार आहे, ज्यापैकी ८० हेक्टर जमीन सरकारकडे उपलब्ध आहे. उर्वरित जमीन भूसंपादनाद्वारे मिळवावी लागणार आहे. आता प्रशासनाने भूसंपादन प्रक्रिया, प्रकल्पाची डिझाईनिंग आणि बांधकामाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याचे नियोजन केले आहे. बीड विमानतळ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील नव्या विमानतळांपैकी महत्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे, असे अधिकारी सांगतात. या प्रकल्पामुळे बीडच्या लोकांसाठी सुविधा, रोजगार आणि आर्थिक प्रगती याची नवी दालनं उघडणार आहेत, ज्यामुळे शहराचे महत्त्व देशाच्या हवाई नकाशावर वाढेल. बीड मोठ्या शहरांशी जोडलं जाणार – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी देखील कामखेडा परिसराचे दौरे करून विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक सुविधा आणि पायाभूत रचनेवर सविस्तर चर्चा केली. त्यांनी विमानतळ उभारणीसाठी लागणारी रणनीती, सुरक्षा निकष आणि पर्यावरणीय बाबींचा तपास केला. विमानतळ प्रकल्प सुरू झाल्यानंतर बीडचा संपर्क मुंबई, पुणे आणि इतर मोठ्या शहरांशी थेट हवाई मार्गाने होणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी वेळ वाचणार, तसेच पर्यटन आणि उद्योगक्षेत्राला चालना मिळेल. स्थानिक व्यापारी, उद्योगपती आणि नागरिकांनी या प्रकल्पाचे स्वागत करण्येयात येत आहे.काही दिवसांपूर्वीच बीडमध्ये रेल्वे धावली. मराठवाड्यातील बीड जिल्हा या रेल्वेमार्गापासून वंचित होता. त्यामुळे, गेल्या तीन पिढ्यांपासून बीडमध्ये रेल्वेचं इंजिन धावावं, रेल्वेची शिट्टी वाजावी, रेल्वेनं बीडमध्ये उतरावं हे स्वप्न बीडकरांनी पाहिलं होतं. अखेर, हे स्वप्न सत्यात उतरलंआहे. आता एसटी, रेल्वेसह विमानसेवाही सुरु होणार असल्यानं आनंद व्यक्त होत आहे.

## पैशाच्या व्यवहारातून...

दरम्यान घडलेली आहे. ज्या तरुणाचे अपहरण करण्यात आले, त्या तरुणाचा मोबाईल बंद येत असल्याचे सांगण्यात आले आहे. आरोपीचे लोकेशन गेवराई पोलीस ट्रेस करत असून ज्या तरुणाचे अपहरण करण्यात आले त्याचा शोध घेतला जात आहे.

## अपघाताने उघडकीस....

धडकली. धडक एवढी जोरदार होती की, वासरांची तस्करी करणारी कार थेट रस्त्यालगत असलेल्या शुभम रमेश रासकर यांच्या शेडमध्ये घुसली. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. अपघातग्रस्त कारची पाहणी केली असता आतमध्ये जे दृश्य दिसले, त्याने उपस्थितांचे हृदय हेलावले. कारमध्ये १५ नवजात वासरे निर्दयपणे कोंबलेली होती. त्यांच्या तोंडाला टेप लावली होती आणि पळून जाऊ नये म्हणून पाय बांधलेले होते. नागरिकांची तत्परता आणि पोलिसांची धाव अपघातग्रस्त वासरांना नागरिकांनी तात्काळ बाहेर काढण्यास सुरुवात केली. शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दीपक सोनवणे, अशोक मुटकुळे, दादासाहेब सोनवणे, अजिनाथ सोनवणे यांच्यासह अनेक तरुणांनी वासरांच्या तोंडाची टेप आणि पाय बांधलेले दोर सोडले. यातील काही वासरांना गंभीर दुखापत झाली होती. घटनेची माहिती मिळताच कडा पोलीस चौकीचे पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर आणि अमोल नवले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून वासरांना ताब्यात घेतले आहे. गोमाफीयांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या वासरांना पुढील उपचारासाठी आणि सुरक्षिततेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील गोशाळेत स्वाधीन करण्यात येणार आहे.

## धनगर आरक्षणासाठी...

आणून ठेवला आहे. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले असून तालुका प्रशासनाची धावपळ उडाली आहे. ज्ञानदेव नामदेव कोल्हे (वय ४५ वर्ष) रा. संतोष नगर गेवराई असे मयताचे नाव आहे. ते पिठाची गिरणी चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. तर धनगर समाजाच्या एसटी प्रवर्गातून आरक्षण मागणीने जोर धरलेला असून यासाठी अनेक मोर्चे निघाले आहेत. तसेच धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे यासाठी दीपक बोराडे सोळा दिवसापासून एसटी आरक्षणासाठी उपोषणाला बसले होते परंतु त्यांच्या मागणीची व त्यांच्या तब्येतीची राज्य सरकार कसलीही दखल घेतली नाही. या नैराश्यातून ज्ञानदेव कोल्हे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. खिशात धनगर समाजाला एसटी आरक्षण मिळत नाही यामुळे आत्महत्या करीत असून, माझे बलिदान वाया जाऊ नये असा चिठ्ठीत मजकूर आहे. यामुळे नातेवाईकांनी आक्रमक पवित्रा घेत गेवराई तहसील कार्यालयासमोर मृतदेह ठेवून ठिय्या मांडला असताना महाराष्ट्र राज्य सरकारने मयत असलेल्या कोल्हे यांना तात्काळ मदत मिळवून द्यावी अशी मागणी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने तहसील मार्फत करण्यात आली आहे. मृतदेह तहसील समोर ठेवल्याने या परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## २ सप्टेंबरचा...

लावल्या आहेत. राज्यातील कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ आणि सदानंद मंडलिक यांच्याकडून हैदराबाद गॅझेटिरविरुद्ध रीट याचिकांच्या माध्यमातून शासन निर्णयाला आव्हान देण्यात आलं होतं. या याचिकांसंदर्भात आज सुनावणी झाली, त्यावर २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेला हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय असंवैधानिक असून तो रद्द करण्याची मागणी याचिकाकत्यारनी केली होती.

## टाकळगाव शिवारातल्या...

दुपारपयरत ओलख पटलेली नव्हती. गेवराई तालुक्यातील टाकळगाव शिवारात असलेल्या एका बंधाऱ्यात ३० ते ३५ वयोगटाच्या तरुणाचा मृतदेह आढळून आला. मयताच्या अंगावर काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, निळ्या रंगाचे शर्ट आहे. हा मृतदेह वाहून आला असावा, असा प्राथमिक अंदाज असून गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातल्या नद्यांना महापूर आलेला आहे. त्यातून कुठला तरी युवक वाहून आला की काय, अशी शंकाही व्य३त केली जात आहे. मयताच्या ओळखीसाठी गेवराई पोलिसांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. ज्यांना या मयताबाबत काही माहिती असेल त्याने पो.कॉ. जायभाये, पो.नि. बांगर त्याचबरोबर गेवराई ठाणे ०२४४२-२६२१००० यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात...

जास्त प्रमाणात होत असताना त्यात पुन्हा अतिवृष्टीची भर पडल्याने आत्महत्या अधिकच होऊ लागल्या. गेल्या दोन महिन्यांच्या कार्यकाळात मराठवाड्यातील दीडशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यात पहिल्यांदा....

शेतकऱ्यांना मदत देण्याची ठोस आणि व्यवहार्य मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. या ऐतिहासिक आणि शेतकरीहिताच्या मागणीची मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेत मनरेगा योजनेतून हेक्टरी ₹३ लाख आणि राज्य शासनाकडून अतिरिक्त ₹४७ हजार, अशा एकूण ₹३ लाख ४७ हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. हा निर्णय म्हणजे खरडून गेलेल्या जमिनींना पुनर्जीवन देणारा दिलासा ठरणार आहे. याशिवाय, छऊठऋच्या विद्यमान दोन हेक्टर मर्यादेच्या पुढे जाऊन मुख्यमंत्री महोदयांनी तीन हेक्टर क्षेत्रपर्यंतच्या शेतजमिनींना मदतीस पात्र करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कडी, सीना, सिंदफणा, मांजरा आणि राज्यातील इतर छोट्या-मोठ्या नदी खोऱ्यांतील शेतकरी वर्गाला थेट लाभ होणार आहे. तसेच, बुजलेल्या विहिरींमधील गाळ काढण्यासाठी ₹३० हजार रुपयांची विशेष तरतूद, शेतीपयोगी जलस्रोत पुनर्संचयित करण्यासाठी केली गेली आहे. या सर्व उपाययोजनांसाठी शासनाने एकूण ₹३१६२८ कोटी रुपयांचे भरीव पॅकेज जाहीर केले आहे – जे मागील काही वर्षांतील सर्वात मोठं शेतकरीहिताचं पॅकेज मानलं जात आहे. शेतकऱ्यांच्या समस्येकडे दूरदृष्टीने पाहून, त्यासाठी राज्याच्या सर्वोच्च पातळीवर आवाज उठवून ठोस निर्णय घडवून आणणारे आ. सुरेश आण्णा धस हे खरं तर कष्टकरी समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ शिरूर (कासार) मतदारसंघातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या दुःखाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर कृतीने पाहणारा नेता म्हणजेच लोकनेते सुरेश अण्णा धस! त्यांच्या या प्रयत्नाबद्दल कष्टकरी समाजमन, शेतकरी वर्ग आणि जनतेच्या मनात प्रचंड कृतज्ञता व्यक्त होत आहे. लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांच्या शेतकरीहिताच्या लढ्याला सलाम!

## सरकारला वठणीवर...

हिच परिणामकारक उपाययोजना आहे या सर्व मागण्या मंजूर करून घेण्यासाठी मा. पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व सर्व शिवसेना नेते, उपनेते, संपर्कप्रमुख, सहसंपर्कप्रमुख, सर्व जिल्हाप्रमुख यांच्या उपस्थितीत संभाजीनगर येथील आयुक्तालयावर मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर , जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले .या आढावा बैठकीला सर्व महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका, सर्व उपजिल्हाप्रमुख, सर्व जिल्हा संघटक, सर्व तालुकाप्रमुख, सर्व युवासेना तालुकायुवा आधिकारी , विधानसभा प्रमुख, किसानसेनेचे पदाधिकारी,विभागप्रमुख, सर्कलप्रमुख, शाखाप्रमुख,व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन बीडचे तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले.

## प्रलंबित दंड ...

यावेळी ११०० केसेसचा ९ लाख ५० हजार रुपयांचा एकूण दंड वसुल करण्यात आला. उपरोक्त अभियान हे पाडळसिंगी टोलनाका, पांगरबावडी पुल, केज टोल नाका, चुंबळी फाटा, धारुर टोलनाका, बर्दापूर टोलनाका, माजलगाव-परभणी टी पॉईंट, इटके कॉर्नर परळी अंभोरा चेक पोस्ट या ९ ठिकाणी राबविण्यात आले. यामध्ये ८ पोलीस निरीक्षक, २३ सहाय्यक पोलीस निरीक्षक २५ पोलीस उपनिरीक्षक, ७८ वाहतुक अंमलदार इतर १७७ अंमलदार ३ आरसीपी प्लाटून यांनी सहभाग नोंदवत दंड वसुल करण्याची कारवाई केली.

## जिल्हाधिकारी साहेबांनी...

दिलासा दिला, आणि त्या कृतीचं सर्वत्र कौतुकही झालं. मात्र, काही महिन्यांतच परिस्थिती उलटी झाली आहे. अतिवृष्टीमुळे खंडाळा परिसरातील सुमारे ५०० एकर जमीन नापिक झाली आहे. पिक पूर्णतः उद्ध्वस्त झालं असून पुढचं पिक घेण्याचीही शक्यता नाही, अशी शेतकऱ्यांची हतबल अवस्था आहे. सरकार शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचं म्हणतंय, पण प्रत्यक्षात मदतीचा एक रुपयाही शेतकऱ्यांच्या हातात पडलेला नाही. पंचनामेच पूर्ण झालेले नाहीत, मग दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळणार कशी? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला. ६ लाख हेक्टरपेक्षा अधिक शेतीचे नुकसान – पण अजूनही पंचनामे प्रलंबित! जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १४ जून रोजी खंडाळा येथे प्रत्यक्ष पेरणी केली होती. त्यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र आता तेच शेतकरी प्रशासनाच्या दारात फिरत आहेत. बीड जिल्ह्यातील प्राथमिक अंदाजानुसार तब्बल ६ लाख हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झालं आहे. शासनाने दिवाळीपूर्वी मदत देण्याची घोषणा केली असली, तरी महसूल विभागाच्या टाळाटाळीमुळे ती शक्य दिसत नाही. कागदोपत्री दिलासा देणं थांबवा; शेतकऱ्यांच्या पदरात प्रत्यक्ष मदत कधी पडणार? असा जळजळीत प्रश्न डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

## प्राथमिक केंद्रामध्ये....

उद्देशातून तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ अक्षय खरवडे आणि डॉ.पूजा शेळके यांच्या नियोजनातून मंगळवार रोजी खास पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले यामध्ये रक्तदाब, मधुमेह, दातांची तपासणी, नेत्ररोग तपासणी, स्त्रियांचे आजार, गरोधर माता यांची तपासणी करण्यात आली, या शिबिराच्या उद्घघाटन प्रसंगी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अभय गोंदीकर, डॉ.संतोष धूत, डॉ.सचिदानंद शिंदे, डॉ.रांदड, डॉ. सोनाली जवध, डॉ.रोहित झरकर, डॉ.विश्वजित डोंगरे, तलवाडा प्रतिनिधी आरोग्य की केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अक्षय खरवडे, डॉ.पूजा शेळके, ननवरे, महेश मरकड, पठाण मेहराज, आरोग्य परिचारिका, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय 100...

होती. तीने राज्यस्तरीय तसेच विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत अनेक पारितोषिक मिळवले आहेत. पोलिस खात्यात नोकरी करण्याची इच्छाशक्ती असल्याने या यशाला तीने गवसणी घातली आकांक्षाला पोलिस भरतीमध्ये दोन वेळेस अपयश आले खचून न जाता सातत्य जिद्दीने अभ्यास करून वनविभागात वनरक्षक पदी पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले होते.अंगी चिकाटी व धावण्याचा नित्य सराव करत असल्याने तिने क्रीडा स्पर्धेत आवड असल्याने मेहनत घेऊन प्रयत्न करत आहे.२६ सप्टेंबर नागपूर येथे क्रीडा स्पर्धा पार पडल्या यामध्ये तिने १०० मीटर धावण्यात बाजी मारत राष्ट्रीय स्तरावर डेहराडून येथे होणा-या स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून या स्पर्धेत देखील बाजी मारत गावचे देशाचे नाव रोशन करणार असल्याचा विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे.तिच्या यशाबद्दल खा.बजरंग सोनवने,आ.सुरेश धस,मा.आ.भिमराव धोंडे,मा. आ.साहेबराव दरेकर,मा.आ.बाळासाहेब आजबे, मा.जि.प.सदस्य सतिश आबा शिंदे,सामाजिक कार्यकर्ते अशोक आण्णा पोकळे,कऱ्हेवडगांवातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य परिसरातील ग्रामस्थांनी शुभेच्छांचा देऊन कौतुक केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गोदाकाठच्या गावांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ विकास अंबटी सरसवले

**● जिल्ह्यात प्रथम उपक्रम जनावरांसाठी कार्यमोहिम शिबिर संपन्न**

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ०६/१०/२०२५ रोजी राहेरी येथे पूरग्रस्त गावातील जणावरांसाठी कार्यमोहीम शिबिर आयोजित करण्यात आले होते. तशेच लाळ, खूरकुत रोगाचे लसीकरण करून जंतनाशक वाटण्यात आले. या वेळेस डॉ. वि.एस.अंबटी पशुधन विकास




अधिकारी (वि), पंचायत समिती गेवराई, संदीप डोईफोडे (पशुधन पर्यवेक्षक), तुषार मरकड (पशुधन पर्यवेक्षक), अनिल लाड (पशुधन पर्यवेक्षक) व विवेक हात्ते (पशुधन पर्यवेक्षक) हे उपस्थित होते. अतिवृष्टी आलेल्या पुरामुळे घराचे पूर्णपणे नुकसान झाले. पूरग्रस्तांचे घरात पाणी शिरले. संसारोउपयोगी सारे उध्वस्त झाले. शेतकरी राजाला मदत करणारे होते, पण शेतकरी राजा आपल्या शेतीचा मालपीक येतो पशुधन म्हणजे शेतकरी राजाचा एक धन आहे. त्याच्या जीवावर शेतकरी राजा शेती करतो आज त्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी लंपीचा आजार असो ढाळ उलटी किंवा निमोनिया दुसरे आजार भौतिक आजार होऊ नये यासाठी काळजी घेणारे डॉ. वि.एस.अंबटी यांनी शिबीर घेण्याचा एक पुढाकार घेतला आहे. त्यांनी राहेरी येथे शेळी, मेंढी, बैल, म्हैस, बैल असे अनेक पशुसंवर्धन तपासणी करण्यात आले. या गावातील व अनेक गावात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. जनावरांची काळजी घेणे म्हणजे त्यांचे कर्तव्य आहे जशी माणसाची काळजी डॉक्टर घेत आहे तसेच पशुधनाची काळजी घेणे हे आमचे कर्तव्य असे त्यांनी आमच्याशी बोलताना सांगितले. तसेच त्यांनी पुढे बोलतांना असे सांगितले की, राजापूर, भोगलगाव, पांढरी, गंगावाडी, बोरगावथडी इतर गावात शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिराबद्दल गावकरी यांनी धन्यवाद व्यक्त केले.

## उत्तम पवार आणि उत्तम हजारे यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्कार समारंभ संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा शैक्षणिक आणि सामाजिक कार्यकर्ते उत्तम वामनराव पवार यांना इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई या संस्थेचा समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आणि दैनिक लोकाशा या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक उत्तम कचरूराव हजारे यांचा पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव ॲड. व्ही.बी. मगर यांच्या शुभहस्ते आणि सर्व संचालक राम शिंदे, बाबुलाल पवार,लक्ष्मणराव शिंदे, माजी मुख्याध्यापक व्ही. जी. आवाड आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार समारंभ उत्साहामध्ये संपन्न झाला.

# सामान्य जनतेची सेवा करणारा शिवछत्र परिवार आहे : ह.भ.प.विशाल महाराज खोले



### भारुड सम्राट प्रभाकर कुटे यांनी मनोरंजनातून केले प्रबोधन

**सायंकाळच्या सत्रात गेवराई तालुक्याचे भुमिपुत्र तथा सुप्रसिद्ध भारुड सम्राट प्रभाकर कुटे यांचा सोंगी भारुडाचा प्रबोधनात्मक कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी विविध अभंग, रचना, भारुड सादर करुन उपस्थितांचे प्रबोधन केले.**

**गेवराई । प्रतिनिधी**

साधुसंत आणि सर्वसामान्य व गोरगरीब जनतेची सेवा करणारा हा शिवछत्र परिवार आहे. कीर्तन महोत्सवाला एवढी मोठी मंडळी गोळा होतात ही आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांची पुण्याई आहे. शिवाजीराव पंडित परिवाराने गेवराई तालुक्यामध्ये सामान्य जनतेसाठी निष्ठेने काम केले त्यामुळेच लोकांनी त्यांना भरभरून प्रेम दिले आहे असे प्रतिपादन ह. भ. प. विशाल महाराज खोले यांनी केले. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सवात ते बोलत होते, त्यांनी आपल्या गोड आवाजातून त्यांनी आवाजातून उपस्थितांना खिळवून ठेवले. यावेळी शिवाजीराव पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गेवराई शहरातील शिवनगरीत माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा आणि कीर्तन सोहळ्यात किर्तनसेवेचे चौथे. पुष्प ह.भ.प. विशाल महाराज खोले यांनी गुंफले.

संत तुकाराम महाराज यांच्या क्षणभरी आम्ही सोशिले वाईट या विराणी भावस्वरूपातील अभंगावर निरूपण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की वारकरी संप्रदाय हा

# छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाच्या दुरावस्थेविरोधात सत्याग्रह आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे शहरातील क्रीडाप्रेमी आणि नागरिकांसाठी महत्त्वाचे केंद्र असले, तरी सध्या हे मैदान पूर्णपणे दुरावस्थेत गेले आहे. मैदानात अस्वच्छता, वाढलेले गवत, गुरे चरणे, स्वच्छतागृहांची दुरवस्था, तसेच क्रिडांगणाचा वापर खेळांऐवजी राजकीय, सामाजिक व व्यावसायिक कार्यक्रमांसाठी होत असल्याने मैदानात चिखल आणि वाहनांच्या खोल खुणा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच क्रीडांगणातील



ओपन जिममधील साहित्य तुटलेले आणि निष्क्रिय झाले असून, त्याकडेही नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे मैदानाची स्वच्छता, सुरक्षारक्षकांची नेमणूक आणि जिम उपकरणांची दुरुस्ती या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या सर्व मागण्यांसाठी आणि क्रीडांगणाच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०६ ऑक्टोबर, सोमवार रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील महात्मा गांधी स्मारकासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान क्रीडांगणाचा राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरावर कायमस्वरूपी बंदी घालावी, तसेच मैदानाचे संवर्धन आणि संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नेमावा अशी ठोस मागणी करण्यात आली.

आंदोलनानंतर नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि क्रीडामंत्री यांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन क्रीडांगणाचे पुनर्वसन व दुरुस्ती कार्य हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलनात प्रा.डी.जी.तांदळे मार्गदर्शन बीड शहर बचाव मंच,

# सावता परिषदेच्या युवक तालुकाध्यक्षपदी संपत सायकड यांची निवड

**समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली रणजीत आखाडे यांनी केली निवड**

**आष्टी । प्रतिनिधी**

माळी समाजाच्या न्याय व हक्कासाठी लढणाऱ्या सावता परिषदेच्या युवक आघाडीच्या आष्टी तालुकाध्यपदी संपत सायकड यांची संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली युवकजिल्हाध्यक्ष प्रा.रणजीत आखाडे यांनी दि.६ ऑक्टोबर रोजी जिल्ह्या कार्यकारणी निवड करण्यात आली.संपत सायकड यांनी मागिल काळात समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना युवक तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांचे निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव व कौतुक होत आहे. तालुक्यातील आष्टी शहरातील सामाजिक कार्यकर्ते



संपत सायकड सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात अग्रेसर असतात समाजाच्या कामामध्ये तन मन धनाने सहभागी होतात मागील अनेक दिवसांपासून समाज संघटन मजबूत करण्याबरोबरच समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून गोरगरीब सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढत आहेत. अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करुन सामाजिक व राजकीय क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे.विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत.ते नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात त्यांच्या निवडीने संघटना बांधणीला मोठा फायदा होणार आहे.त्यांनी केलेल्या कार्याच्या दखल घेऊन सावता परिषद संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सावता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष गणेशराव दळवी, सावता परिषदेचे युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गाडेकर व,प्रधान महासचिव डॉक्टर राजीव काळे व बीड जिल्हाध्यक्ष किशोर राऊत,आष्टी तालुकाध्यक्ष बाबासाहेब वाघुले यांच्या सहकार्याने युवक बीड जिल्हा अध्यक्ष या नात्याने प्राध्यापक रणजीत शिवाजी आखाडे यांनी बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली असून यामध्ये संपत सायकड

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह सोहळा

**संत कृपा हाच खरा तारणहार , संतांनी केलेले उपकार शब्दात सांगता येत नाही: रामराव महाराज ढोक**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त शनिवार दि. ०४/१०/२०२५ रोजी संध्याकाळी हभप श्री रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांची कीर्तनाची सेवा संपन्न झाली.

या कीर्तनात त्यांनी संत सेना महाराज यांचा ओंजळीस आलेला 'उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!!'हा अभंग निवडला होता. या अभंगाद्वारे त्यांनी श्रोत्यांच्या मनात संतांच्या कृपेचे, उपकारांचे आणि मार्गदर्शनाचे सुवर्णाक्षर कोरून दिले.

किर्तनकार श्री. रामराव महाराज ढोक यांनी सादर केलेल्या या अभंगातून संतांच्या महत्त्वाचे खोलवर विश्लेषण केले. अभंगातील 'उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!!' या ओळीतून संत हे केवळ उपदेशक




नसून, मायेचे आणि कृपेचे सागर, मायबाप स्वरूप आहेत, ही भावना व्यक्त झाली आहे. 'केवढा केला उपकार ! काय वाणू मी पामर!!' या ओळीतून साधक स्वतःला पामर (अत्यंत क्षुल्लक) म्हणवून घेऊन, संतांनी केलेला उपकार शब्दांत सांगता येणार नाही इतका मोठा आहे, याची खंत व्यक्त केली आहे. 'जड जीवा उद्धार केला! मार्ग दाखविला सुपंथ !!' यामध्ये संतांनी जड आणि भौतिकतेत गुरफटलेल्या जीवाला सहजासहजी उद्धरून, त्याला परमार्थाचा सरळ मार्ग (सुपंथ) दाखविला, याचे वर्णन आहे. शेवटच्या दोन ओळी 'सेना म्हणे उतराई ! होता काही दिसेना !!' यात संत सेना महाराज सांगतात की, संतांनी केलेल्या या सर्व उपकारांची परतफेड (उतराई) करणे शक्य नाही, कारण संतांच्या कृपेपूर्वी साधकाला काहीच दिसत नव्हते, म्हणजेच त्याची स्थिती अंधारातील होती. अभंगामागील संदेश स्पष्ट करताना कीर्तनकार म्हणाले, की संत-कृपा हाच खरा तारणहार आहे आणि संतच भक्ताला भगवद्प्राप्तीचा सोपा मार्ग दाखवितात. ही कीर्तन सेवा उत्साहात, भक्तिभावातून पार पडली. यावेळी सांगवी पाटण व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भक्त, संत, महंत उपस्थित होते. सप्ताह समितीने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

# गणिताच्या उत्क्रांतीचा प्रवास व करिअरच्या संधी या विषयावर डॉ. सातपुते यांचे व्याख्यान संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस.के.महाविद्याय बीड येथील गणित विभागामार्फत इव्होल्युशन ऑफ मॅथेमॅटिक्स अँड इट्स करिअर या विषयावर वैद्यनाथ महाविद्यालय परळी येथील गणित विभाग प्रमुख डॉ. बी. एस. सातपुते यांच्या व्याख्यानाचे आयोजन आज दिनांक ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी भूषविले. आपल्या व्याख्यानात डॉ. सातपुते यांनी गणिताच्या उत्क्रांतीचा इतिहास अतिशय सोप्या भाषेत मांडला त्यांनी सांगितले की गणिताची सुरुवात साध्या मोजणी पासून होऊन ते संगणक शास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, आणि डेटा सायन्स सारख्या आधुनिक क्षेत्रापर्यंत पोहोचली आहे. भारतीय गणितज्ञ आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त ,भास्कराचार्य, रामानुजन यांचे विविध काळातील गणितातील योगदान त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी गणित विषयातील विविध करिअरच्या संधी जसे की संशोधन, बँकिंग, डेटा सायन्स, आयआयटी व उद्योगक्षेत्र इत्यादी याविषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी गणित हा विषय जीवनामध्ये किती महत्त्वाचा आहे यावर प्रकाश टाकला आणि विविध विषयातील संशोधनामध्ये गणिताचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. गणित विषयात गोडी निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयात उपस्थित राहाने आवश्यक आहे असे नमूद केले. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री. जालिंदर कोळेकर हे उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी नगर विभागीय रायफल शुटिंग स्पर्धेत चि. तानाजी काळे तृतीय

**श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा! सर्वस्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत १० मीटर (वय गट:१७) शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी चि. तानाजी काळे याने यशस्वी कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळविला. त्या नंतर त्याची छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय रायफल शूटिंग स्पर्धा १० मीटर (वय गट:१७) या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. ०४ ऑक्टोबर रोजी झालेल्या विभागीय स्पर्धेचा निकाल ०५ ऑक्टोबर रोजी जाहीर झाला. यामध्ये चि. तानाजी काळे याने तृतीय क्रमांक पटकावला. छत्रपती संभाजी नगर विभागीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावत श्री महालक्ष्मी माध्यमिक



विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा रोवण्याची यशस्वी कामगिरी चि. तानाजी काळे याने केली. त्याच्या या उज्ज्वल यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांने बलभीम महाविद्यालयात बुधवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेत १० मीटर (वय गट:१७) प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतर ०४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय शालेय शूटिंग क्रीडा स्पर्धा १० मीटर (वय गट:१७) सन २०२५ साठी त्याची निवड झाली. या स्पर्धेसाठी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड एकूण सहा जिल्ह्यातील दहा खेळाडू विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत चि. तानाजी काळे याने तृतीय क्रमांक मिळवत श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा रोवण्याचे काम केले आहे. छत्रपती संभाजी नगर विभागीय स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक मिळवलेल्या चि. तानाजी काळे याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, गावातील प्रतिष्ठित नागरिक राजेश भाऊ देवकते, संतोष नरवडे, त्याचे वडील सुभाष काळे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी तोंडभरून कौतुक करत त्याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

# बुद्धिबळाचा उगवता सितारा: बीडच्या सोहम लांगोरेची जिल्हा स्पर्धेत पुन्हा बाजी

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या बुद्धिबळ विश्वात सोहम लांगोरे या नवोदित खेळाडूचे नाव सध्या चमकत आहे.चंपावती विद्यालयातील इयत्ता ९ वी मध्ये शिकणाऱ्या या होतकरू खेळाडूने काल झालेल्या बीड जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावून आपल्यातील कौशल्याची पुन्हा एकदा चुणूक दर्शवली आहे.१६०० इतकी प्रभावी फिडे रेटिंग असलेला सोहम हा आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन प्राप्त केलेला खेळाडू आहे. त्याचे स्वप्न आहे बुद्धिबळातील सर्वोच्च मानला जाणारा ग्रँड मास्टर हा किताब मिळवण्याचे, आणि या दिशेने त्याचा प्रवास जोमाने सुरू आहे. सोहमने केवळ बीड जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यभरातील अनेक आंतरराष्ट्रीय फिडे चेस स्पर्धांमध्ये आपली छाप सोडली आहे. अहिल्यानगर, सांगली, पुणे,



संभाजीनगर, नाशिक, पाथर्डी, धाराशिव, येडशी, श्रीरामपूर आणि आळंदी येथे झालेल्या स्पर्धांमध्ये त्याने अनेक पदके आणि रोख बक्षिसे जिंकली आहेत. या यशामुळे तो महाराष्ट्रातील बुद्धिबळपटूंमध्ये एक आश्वासक चेहरा म्हणून पुढे येत आहे. सोहमला श्री.दत्तात्रेय क्षीरसागर आणि श्री. रामप्रसाद शेंडगे सरांचे बहुमोल मार्गदर्शन मिळत आहे. त्याचबरोबर बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव श्री.अशोक कागदे सरांचे सहकार्यही त्याच्या पाठीशी उभे आहे.

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ०८ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

# राज्यात पहिल्यांदा आ.सुरेश धस यांच्या मागणीची मुख्यमंत्री यांनी घेतली दखल

**अतिवृष्टीत खरडून गेलेल्या जमिनींसाठी हेक्टरी ३ लाख ४७ हजार रू.मिळणार.. शेतकऱ्यांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय**

आष्टी । प्रतिनिधी



मराठवाडाभूषण लोकनेते आ.सुरेश अण्णा धस यांच्या शेतकरी हिताच्या लढ्याला सलाम करावा असा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाने घेतला आहे याबाबत चे सविस्तर वृत्त असे की, अतिवृष्टी आणि पुराम ुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. मातीतून उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन अक्षरशः उद्धवस्त झाले. या संकटाकडे पाहून लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी राज्यात सर्वप्रथम पुढाकार घेऊन, अशा जमिनींना मनरेगा योजनेत समाविष्ट करून ▶ उर्वरित पान २ वर

### सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रकडून राज्य सरकार व आ.सुरेश धस यांचे आभार..

गेल्या काही दिवसांपासून राज्यभर पडलेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे लाखो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतीजमिनी खरडून गेल्या असून घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नुकसानग्रस्त भागांसाठी तात्काळ मदत पॅकेज जाहीर केले आहे. या संदर्भात लोकनेते आमदार सुरेश धस यांनी नुकतेच राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना मदतीसाठी ठोस निर्णय घेण्याची आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने निर्णय घेतला आहे. सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार सुरेश धस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नुकसानग्रस्त भागांना दिलासा देणारे हे मदत पॅकेज जाहीर केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

## सरकारला वठणीवर आणण्यासाठी संभाजीनगर येथील हंबरडा मोर्चास बीड जिल्हातील शेतकरी व शिवसैनिकांनी ताकदीने सहभागी व्हावे : अंबादास दानवे

बीड । प्रतिनिधी



पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आज शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांनी बीड जिल्हातील सहाही विधानसभा क्षेत्रातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक यांची अढावा बैठक बीड शहरातील हॉटेल नीलकमल येथे घेतली व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात येणाऱ्या ११/१०/२०२५ रोजी संभाजीनगर येथील आयुक्तालयावर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी होणारया हंबरडा मोर्चा संदर्भात सर्व पदाधिकारी यांचे मत जाणून घेतली व आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की , गेल्या विधानसभा निवडणुकीत या सरकराने सांगितले होते की , आम्ही शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करु ,पण तीन्ही अधिवेशनात या सरकराने कुठलाही निर्णय घेतला नाही, राज्यातील शेतकरी सततचा दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी ,महागडी खते , यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे, अनेकांना थकबाकी, जप्तीच्या नोटिसा, यामुळे शेतकरी आत्महत्याचे पाऊल उचलत आहे या पार्श्व भूमीवर शेतकऱ्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी तातडीची सरसकट कर्जमाफी ▶ उर्वरित पान २ वर

### प्रलंबित दंड वसुलीसाठी जिल्हा पोलीस दलाचे विशेष अभियान

बीड । प्रतिनिधी

शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनवीत काँवत यांच्या संकल्पनेतून आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर तसेच अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाईच्या चेतना तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात २८ पोलीस स्टेशन अंतर्गत ९ ठिकाणी प्रलंबित दंड वसुल अभियान राबविण्यात आले ▶ उर्वरित पान २ वर



*शिवतेज नगर, शंभुराजे नगर, शहाजी पार्क, व शिव पार्क या सर्व कॉलनीमधील नागरिकांनी शेतकऱ्यांस अर्थसहाय्य मदत जिल्हा अधिकारी यांच्या स्वाधीन केले.*

## जिल्हाधिकारी साहेबांनी चाड्यावर मुठ धरुन पेरलेले "सोयाबीन" आज पावसात वाहून गेले; खंडाळ्यातील शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा

**अहवाल कधी पाठवणार आणि नुकसानभरपाई कधी मिळणार ? : डॉ. गणेश ढवळे**

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील खंडाळा येथील शेतकरी बाबासाहेब चिंतामण जायभाये यांच्या शेतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः चाड्यावर मुठ धरत सोयाबीनची पेरणी केली होती. त्या वेळी जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं असल्याचा ▶ उर्वरित पान २ वर



## प्राथमिक केंद्रामध्ये आयोजित आरोग्य शिबिरात दोनशेहून अधिक रुग्णांची तपासणी

**तज्ञ डॉक्टरकडून पूरग्रस्त भागातील नागरिकांना आरोग्य सेवा**

तलवाडा । प्रतिनिधी



तलवाडा परिसरातील गोदावरी नदी काठच्या पूरग्रस्त गावातील जनतेसाठी तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिराचे उद्धघाटनय सकाळी दहा वाजण्याच्या वेळेत मान्यवरांच्या उपस्थिती करण्यात आले या शिबिरात गोदाकाठच्या गावातील आणि तलवाडा परिसरातील दोनशेहून अधिक नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली या शिबिरास जिल्ह्यातील विशेष तज्ञ डॉक्टर यांच्याकडून तपासणी करून त्यांना उपचार देण्यात आला. गेवराई तालुक्यातील तलवाडा परिसरातील गोदाकाठच्या गावात गोदावरीला पूर आल्याने या गावातील नागरिकांच्या आरोग्य समस्या जाणून घेऊन त्यांना आरोग्य सेवा देऊन विशेष तज्ञ डॉक्टर यांच्याकडून तपासणी करून त्यांच्या आजाराविषयी म ार्गदर्शन व्हावे त्यांना मदत मिळावी या ▶ उर्वरित पान २ वर

**वनविभागाच्या क्रिडा स्पर्धेत कऱ्हेवडगांवच्या आकांक्षा खांडवे ची राष्ट्रीय स्तरावर निवड**

## राज्यस्तरीय 100 मीटर धावणे स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरावर निवड

आष्टी । प्रतिनिधी



वन विभागामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा कऱ्हेवडगांवची कन्या आकांक्षा उर्मिला सोमीनाथ खांडवे हि नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय १०० मीटर धावणे स्पर्धेत यश संपादन करुन डेहराडून येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धेत तिची निवड झाल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील कु.आकांक्षा सोमीनाथ खांडवे हीने कठोर परिश्रम करत जिद्द आणि चिकाटीने कऱ्हेवडगांव सारख्या ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधांचा अभाव असताना देखील संकटांचा सामना करत परिस्थितीशी दोन हात करत हे यश मिळवून गावच्या इतिहास पहील्यांदाच वनविभागात नौकरी मिळवली आई व वडील शेती करुन आपल्या मुलांना अतिशय कष्ट घेत शिकवले आहे.आकांक्षा खांडवे हिस शालेय जीवनापासून खेळाची आवड ▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आरक्षण आंदोलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्या संजय पवार यांच्या कुटुंबाला आधार



बीड । प्रतिनिधी

मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनाम ध्ये मृत्युमुखी पडलेल्या बीडच्या घोसापुरी गावातील संजय पवार यांच्या कुटुंबाला माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांनी तीन लाख रुपयाची मदत केली. यावेळी व्हिडिओ कॉल वरून पवार कुटुंबाशी संवाद साधत कुटुंबाला धीर दिला तसेच मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली..यावेळी काळजी करू नको काका म्हणून तुझ्या पाठीशी आहे. असा शब्द दिला.. मराठा सेवक अशोक रोमन यांनी ही तीन लाख रुपयाचा धनादेश कुटुंबाला सुपूर्द केला. या अगोदर माजी मंत्री आ तानाजी सावंत यांनी शंभर कुटुंबाला मदत केली आहे.

तानाजी सावंत यांचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि छावा जिल्हाध्यक्ष अशोक रोमन आणि जय शिवसंग्राम चे स्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या हस्ते पवार कुटुंबाला तीन लक्ष रुपयांची मदत देण्यात आली.

**माजी मंत्री आ. तानाजी सावंत यांच्याकडून तीन लाख रुपयांची मदत. अन् मुलांच्या शिक्षणाची घेतली जबाबदारी ; व्हिडिओ कॉल वरून कुटुंबाशी संवाद.**

## थोडक्यात...

### ढाळेवाडीच्या प्रितम हुलेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यातील ढाळेवाडी येथील प्रीतम शामराव हुले हिने नुकतीच संभाजीनगर येथे आयोजित झालेल्या कुस्ती स्पर्धेत १४ वर्षाखालील ३६ किलो वजनी गटात विजय मिळवून राज्यस्तरीय निवडीस पात्र ठरली.प्रीतमच्या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि कुस्तीतील कौशल्य आहे. स्पर्धेत तिने आपली ताकद, तंत्र, चपळाई आणि मानसिक सक्षमता सिद्ध केली. तिच्या या यशामुळे पाटोदा तालुक्यातील खेळ क्षेत्रात नवीन उत्साह निर्माण झाला आहे.संभाजी नगर येथे झालेल्या स्पर्धेत राज्यातील अनेक खेळाडू सहभागी झाले होते. प्रितमने आपले वर्चस्व कायम ठेवत आपल्या वजन गटातील सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. प्रशिक्षकांनी तिच्या तयारीला, चिकाटीला आणि खेळातील शिस्तीला अभिनंदन केले आहे.सातत्यपूर्ण मेहनत आणि चिकाटीमुळे प्रितम विजेतेपद मिळवू शकली. स्थानिक खेळ मंडळ आणि कुटुंबीयांनी तिला पुढील राज्यस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या यशामुळे पाटोदा तालुक्यातील मुलींमध्ये कुस्तीसारख्या खेळांमध्ये सहभाग वाढण्याची प्रेरणा मिळाली.प्रितम पुढील राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.प्रीतमच्या या यशामुळे स्थानिक खेळाडू, कुटुंबीय आणि नागरिक अत्यंत आनंदित आहेत. तिच्या मेहनतीने आणि चिकाटीने एक आदर्श तयार झाला आहे, ज्यातून इतर मुलींनाही खेळामध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे.अभिनंदन प्रितम ! तुझ्या मेहनतीला आणि जिद्दीला सलाम ! पुढील स्पर्धांमध्येही तु महाराष्ट्राचे नाव उज्वल कराल अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### वाळू चोरीचे गुन्ह्यातून दोन आरोपींची निर्दोष मुक्तता



बीड । प्रतिनिधी

फिर्यादी संजय सूर्यकांतराव इंगोले मंडळ अधिकारी तहसील कार्यालय बीड यांनी दिनांक ०७/०७/२०२१ रोजी पोलीस स्टेशन पेठ बीड येथे इम्रान पठाण मोहहमद पठाण व शेख जमील शेख छोटू मिया यांचे विरुद्ध दिनांक २६/०६/२०२१ रोजी खंडेश्वरी रोडवर वाहन क्रमांक एम.एच०५बी. डी ८८९९ विना परवानाअवैध वाळू वाहतूक करीत असले बाबत आरोपी विरुद्ध कलम ३७९,३४ भा.द.वि व कलम ४८,४८(१)(२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा.र. नंबर १२१/२०२१ अन्वये गुन्हा नोंद केला. तपासी अधिकारी श्री.पवार यांनी माननीय न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरणात एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले पैकी तीन साक्षीदार फिर्यादी संजय इंगोले (मंडळ अधिकारी), अभय जोशी(नायब तहसीलदार), सुरेंद्र डोके(नायब तहसीलदार) हे शासकीय अधिकारी होते साक्षीदाराचे साक्षी पुराव्यातील विसंगती व आरोपीचे वकिलांनी घेतलेला प्रबळ बचाव ग्राह्य धरून माननीय मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड श्री.पी. आर.शिंदे साहेब यांनी आरोपिंची सबळ पुराव्याअभावी व संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्तता केली आरोपीचे वतीने ॲड. राजेश जाधव यांनी काम पाहिले त्यांना ॲड. विवेक डोके, ॲड.सतीश गाडे, ॲड. सागर नाईकवाडे, ॲड.सुधीर जाधव, ॲड. रुचके, ॲड. कुलदीप गावडे, यांनी सहकार्य केले.

### स्त्री व कुटीर रुग्णालय येथे मा.आदित्य (दादा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फळ वाटप



बीड । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत माऊली विद्यापीठ केज संस्थेचे सचिव आदित्य (दादा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्त्री व कुटीर रुग्णालय नेकनूर येथे रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ढास डी.के., डॉक्टर ठाकरे व डॉक्टर शेख मुख्तार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. व प्रा.रामरुले डी.के. तसेच स्त्री व कुटी रुग्णालयातील डॉक्टर, नर्स यांच्या हस्ते फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खो-खो मैदानावर राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या मुलींचा डंका

**दोन्ही संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड**



बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद बीड आणि जिल्हा खो-खो असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत राजर्षी शाहू कन्या विद्यालय, बीड या शाळेच्या १४ वर्षाखालील आणि १७ वर्षाखालील मुलींच्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे. या दोन्ही संघांची गेवराई येथे होणार्या जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात जिल्हा परिषद शाळा, हिंगणी संघाचा १ डाव व ५ गुणांनी पराभव केला. तर १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने नाळवंडी हायस्कूल संघाचा ६ गुणांनी पराभव करून विजेतेपद मिळवले. या स्पर्धेत विजयश्री मिळवलेल्या दोन्ही संघांना संस्थेचे सचिव तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. जे.पी. शेळके, प्रशिक्षक तुकाराम करांडे आणि विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख व्ही.डी. मातकर यांचे नियमित मार्गदर्शन लाभले.